आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र – संध्याकाळी ७.०० वाजता
२३ सप्टेंबर २०२२ – शुक्रवार

## <u>ठळक बातम्या</u>

- जगाला भेडसावणाऱ्या समस्यांचं कायमस्वरूपी निराकरण करण्यात नवा भारत जगाचं नेतृत्व करत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- आष्टी ते अहमदनगर या ६५ किलोमीटर रेल्वेमार्गाचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे लोकार्पण

- शिवाजी पार्कवर दसरा मेळाव्यासाठी उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला मुंबई उच्च न्यायालयाची परवानगी

- देशव्यापी कोविड प्रतिबंधक लसीकरण मोहिमेत खबरदारीची लसमात्रा घेतलेल्यांची संख्या २० कोटीच्या वर

**आणि**

- मुंबई शेअर बाजाराच्या निर्देशांकात १ हजार २१ अंकांची घसरण

**<><><><><><>**

जगाला भेडसावणाऱ्या समस्यांचं कायमस्वरूपी निराकरण करण्यात नवा भारत जगाचं नेतृत्व करत आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. गुजरातमध्ये एकता नगर इथं आयोजित केलेल्या सर्व राज्यांच्या पर्यावरण मंत्र्यांच्या राष्ट्रीय परिषदेचं उद्घाटन आज त्यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे झालं, त्यावेळी ते बोलत होते.

आंतरराष्ट्रीय सौर आघाडीपासून पर्यावरणास्नेही जीवनशैलीचा पुरस्कार करणाऱ्या 'लाइफ मूव्हमेंट' या जागतिक उपक्रमापर्यंत भारत सर्वात पुढे आहे, असं ते म्हणाले. नवीन भारत, नवीन दृष्टिकोन आणि नव्या विचारांच्या साहाय्यानं झेप घेत

आहे, भारत आज एक झपाट्यानं विकसित होणारी अर्थव्यवस्था असून पर्यावरणाचं रक्षण करण्यासाठी आपण सातत्यानं प्रयत्न करत आहोत, पर्यावरण रक्षण ही वैयक्तिक नाही तर सामूहिक जबाबदारी आहे, असं ते म्हणाले. सर्व राज्यांनी पर्यावरण संवर्धनासाठीच्या सर्वोत्तम पद्धती जाणून घ्याव्यात, आणि देशभरात त्यांची प्रभावी अंमलबजावणी करावी, असं आवाहन त्यांनी केलं.

<><><><><>

बीड जिल्हा वासीयांचं रेल्वेचं अनेक वर्षांपासूनचं स्वप्न पूर्ण झालं असून, हा रेल्वे मार्ग बीड आणि परळीपर्यंत नेण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करील असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. ते आज न्यू आष्टी-अहमदनगर रेल्वे सेवेचं दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून उद्घाटन करताना बोलत होते. आष्टी इथून सुटणाऱ्या पहिल्या डेमू पॅसेंजर गाडीला मुख्यमंत्र्यांनी यावेळी हिरवा झेंडा दाखवला. रेल्वे मार्गाचं पुढलं काम लवकर पूर्ण करण्यासाठी शासन स्तरावरून निधीची कमतरता पडू दिली जाणार नाही असं आश्वासन त्यांनी यावेळी दिलं. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे, महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री पंकजा मुंडे आणि मान्यवर यावेळी उपस्थित होते.

<><><><><>

मुंबई उच्च न्यायालयानं उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला शिवाजी पार्कवर दसरा मेळावा घेण्यासाठी परवानगी दिली आहे. यासंदर्भात शिवसेनेनं दाखल केलेल्या याचिकेवर मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठासमोर आज सुनावणी झाली. त्यावेळी न्यायालयानं येत्या ५ ऑक्टोबरला, दसऱ्याच्या दिवशी मेळावा घेण्यासाठी उद्धव ठाकरे गटाला परवानगी दिली.

शिवाजी पार्कवर दसरा मेळावा घ्यायची परवानगी मिळावी, असा अर्ज उद्धव ठाकरे तसंच शिंदे गटानं मुंबई महापालिकेकडे दाखल केला होता. महापालिकेनं कायदा

आणि सुव्यवस्थेचं कारण देत दोघांना परवानगी नाकारली होती. शिवसेनेनं मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.

<><><><><>

नाशिक शिवसेनेच्या पदाधिकारी आणि नगरसेवकांनी आज मुंबईत पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. यावेळी भाजपाच्या माजी नगरसेवक पूनम धनगर यांनी शिवसेनेत प्रवेश केला. जनमत आपल्या बरोबर आहे, त्यामुळे एकसंघ राहून सध्याच्या राजकीय परिस्थितीचा सामना करा, असं आवाहन उद्धव ठाकरे यांनी यावेळी केलं.

<><><><><>

भारतीय जनता पक्ष आणि शिवसेनेचा शिंदे गट यापुढे सर्व निवडणुका एकत्रित लढवणार असल्याचं भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटलं आहे. ते आज औरंगाबाद इथं वार्ताहरांशी बोलत होते. पक्षातर्फे येत्या काळात राबवल्या जाणाऱ्या विविध कार्यक्रमांची माहिती त्यांनी यावेळी दिली.

<><><><><>

राज्यासह देशभरात वर्ष २०२२-२३ पासून ‘पंचायतराज यंत्रणेच्या माध्यमातून शाश्वत विकासाच्या ध्येयांची’ प्रभावी अंमलबजावणी करणं हे महत्त्वाचं उद्दिष्ट आहे. असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं. राष्ट्रीय ग्रामस्वराज अभियान 'शाश्वत विकास ध्येयांचं स्थानिकीकरण’ याविषयावरच्या राष्ट्रीय कार्यशाळेत ते आज बोलत होते.

ही ध्येयं साध्य करण्यासाठी आपलं राज्य आणि पंचायतराज संस्थांचं योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण ठरेल, असं ते म्हणाले.या ध्येयांची अंमलबजावणी करण्यासाठी केंद्र सरकारनं निश्चित केलेल्या संकल्पना राज्यात प्रभावीपणे राबविण्यासाठी राज्य सरकारनं पुढाकार घेतला आहे. या कार्यशाळेच्या माध्यमातून

ग्रामस्वच्छता आणि शुद्धपाणी याविषयावर सखोल चर्चा आणि उहापोह होऊन त्याचा फायदा गावांमध्ये यासंदर्भातल्या योजनांची अंमलबजावणी आणि जाणीवजागृतीसाठी करता येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. समाजातल्या दुर्बल, वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्याचे प्रयत्न सुरू असून राज्याच्या विकासासाठी केंद्र आणि राज्य शासन हातात हात घालू काम करत आहे, असं मुख्यमंत्री म्हणाले.

**<><><><><>**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन कालपासून महाराष्ट्रातल्या बारामती लोकसभा मतदार संघाच्या दौऱ्यावर आहेत. भारतीय जनता पार्टीच्या लोकसभा प्रवास योजनेअंतर्गत आयोजित या दौऱ्यात आज त्यांनी पुरंदर तालुक्याला भेट दिली. विकासाचा लाभ समाजातल्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचावा, हे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतल्या आकांक्षी जिल्हा योजनेचं उद्दिष्ट आहे, मात्र बारामतीचा विकास पक्षपाती पद्धतीनं सुरु असून भाजपाला समर्थन देणाऱ्या इथल्या नागरिकांना याचा अनुभव येत आहे, अशी टीका त्यांनी यावेळी केली.

सीतारामन यांनी पुरंदर तालुक्यातल्या जेजुरी इथल्या खंडोबा मंदिरात जाऊन दर्शन घेतलं तसंच पुरंदरमधल्या पंचायत प्रतिनिधींशी स्थानिक प्रश्नांवर संवाद साधला. त्यानंतर त्यांनी मोरगाव इथल्या प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट देऊन आयुष्मान भारत योजनेच्या लाभार्थ्यांची देखील भेट घेतली.

**<><><><><>**

चंद्रपुरात पर्यावरण पूरक प्रकल्पांना प्राधान्य देण्यात येणार असल्याचं केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदिपसिंग पुरी यांनी आज सांगितलं. ते तीन दिवसांच्या चंद्रपूर दौऱ्यावर असून आज दुसऱ्या वार्ताहर परिषदेत बोलताना त्यांनी केंद्र सरकारच्या विविध योजनांची माहिती दिली. वाढतं प्रदूषण ही चिंतेची बाब आहे.

प्रदुषण कमी करण्यासाठी ग्रीन योजना आणल्या आहेत. उज्वला, बायो फ्युएल, ग्रीन हायड्रोजन, इलेक्ट्रिकल वाहन यावर सातत्यानं काम सुरू आहे, असं त्यांनी सांगितलं.

कोकणातला रत्नागिरी रिफायनरी प्रकल्प चंद्रपुरात येणार असल्याच्या वृत्ताचं त्यांनी खंडन केलं. चार लाख कोटी रुपये गुंतवणुकीच्या या प्रकल्पाची क्षमता वार्षिक ६० दशलक्ष टन आहे. स्थानिक पातळीवर विरोध पाहता २०-२०-२० दशलक्ष टन असं त्रिभाजन करून एक युनिट रत्नागिरी आणि नागपूर इथं उभारलं जाऊ शकतं, असं त्यांनी स्पष्ट केलं. याबाबत संभ्रम निर्माण होऊ नये, असं पुरी यांनी सांगितलं.

यावेळी चंद्रपूर जिल्हा काँग्रेस'च्या वतीने पेट्रोल दरवाढीचा निषेध करण्यात आला. वार्ताहर परिषदेनंतर पुरी बल्लारपूरला गेले. त्यांनी प्रथम सैनिक शाळेला भेट दिली. शहरातल्या जेनरिक मेडिकल आणि रेशन दुकानांना भेट देत लाभार्थ्यांशी त्यांनी संवाद साधला.

**<><><><><>**

उत्तर प्रदेशातल्या लखीमपूर खिरी मधल्या अत्याचारात मरण पावलेल्या दलित मुलींच्या कुटुंबियांची केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी आज सांत्वनपर भेट घेतली. हा खटला जलद गती न्यायालयात चालवून गुन्हेगारांना फाशीची शिक्षा द्यावी यासाठी प्रयत्न करणार असल्याचं आश्वासन आठवले यांनी दिलं. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती, अत्याचार प्रतिबंधक कायद्याअंतर्गत मृत मुलींच्या कुटुंबाला सामाजिक न्याय मंत्रालयातर्फे १६ लाख ५० हजार रुपयांचं साहाय्य केलं जाईल, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

देशव्यापी कोविड प्रतिबंधक लसीकरण मोहिमेत आज सकाळपासून १२ लाखापेक्षा जास्त नागरिकांचं लसीकरण झालं. त्यामुळे आतापर्यंत लाभार्थ्यांना

दिलेल्या मात्रांची एकूण संख्या २१७ कोटी ३८ लाखाच्या वर गेली आहे. आज साडे ९ लाखापेक्षा जास्त नागरिकांनी खबरदारीची लसमात्रा घेतली. आत्तापर्यंत २० कोटी ३ लाखापेक्षा जास्त लाभार्थ्यांनी खबरदारीची लसमात्रा घेतली आहे.

राज्यात आज सकाळपासून ४० हजार नागरिकांचं लसीकरण झालं. राज्यात आत्तापर्यंत लाभार्थ्यांना दिलेल्या मात्रांची एकूण संख्या १७ कोटी ६९ लाखाच्या वर गेली आहे.

**<><><><><><>**

जागतिक शेअर बाजारातल्या घसरणीचे पडसाद आज देशांतर्गत बाजारांमधेही पडले, आणि निर्देशांक जवळजवळ पावणे दोन टक्क्यानं घसरले. मुंबई शेअर बाजाराच्या निर्देशांकात आज दिवसअखेर १ हजार २१ अंकांची घसरण झाली, आणि तो ५८ हजार ९९ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही ३०२ अंकांची घसरण नोंदवत, १७ हजार ३२७ अंकांवर बंद झाला.

**<><><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या रविवारी ‘मन कि बात’ या कार्यक्रमातून देशाच्या जनतेशी संवाद साधणार आहेत. हा कार्यक्रम रविवारी सकाळी ११ वाजता आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवरून प्रसारित होणार असून हा या कार्यक्रमाचा त्र्यांणवावा भाग आहे.

**<><><><><><>**

राज्यात महिनाभरात सार्वत्रिक निवडणुका घेऊन दाखवण्याचं आव्हान शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी दिलं आहे, ते भाजपानं स्विकारावं, असं विधान परीषदेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी म्हटलं आहे. ते आज नाशिक जिल्ह्यात मनमाड इथं बातमीदारांशी बोलत होते. यावेळी त्यांनी केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांच्यावर केलेल्या एकेरी टीकेचाही समाचार

घेतला. शिवसेनेचा दसरा मेळावा हा दरवर्षी शिवतीर्थावरच होत असतो, ही शिवसेना प्रमुखांपासूनची परंपरा आहे, त्यामुळे यावेळी दसरा मेळावा शिवतीर्थावरच होईल, असं दानवे म्हणाले.

**<><><><><>**

काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या भारत जोडो पदयात्रेला मिळणारा प्रचंड प्रतिसाद पाहून जाती-धर्मात तेढ निर्माण करुन व्देषाचं राजकारण करणाऱ्या पक्ष आणि संघटनांना मुस्लिम समाज आठवला, असं महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी म्हटलं आहे. ते आज मुंबईत बातमीदारांशी बोलत होते. हा देश सर्वांचा आहे, विविधतेत एकता ही या देशाची ओळख आहे आणि ती जपण्याचं काम काँग्रेस करत आहे, असं ही पटोले म्हणाले.

**<><><><><>**

पालघर जिल्ह्यातल्या पश्चिम किनारपट्टी भागांमध्ये सध्या स्थलांतरित पक्ष्यांच्या आगमनाला सुरुवात झाली आहे. थंडीच्या मोसमाची चाहूल लागताच हे परदेशी पक्षी जिल्ह्यातल्या विविध किनारपट्टी भागांत दिसून येतात. हजारो किलोमीटरचा प्रवास करत हे पक्षी पालघरच्या पश्चिम किनारपट्टीच्या भागांमध्ये विश्रांतीसाठी वास्तव्य करत असतात. सध्या हे परदेशी पाहुणे जिल्ह्यातल्या चिंचणी समुद्रकिनारी दिसून येत आहेत. पालघर जिल्ह्यातल्या किनारपट्टी आणि खाडी भागांत या स्थलांतरीत पक्ष्यांना मुबलक प्रमाणात अन्न उपलब्ध होत असल्यानं हे पक्षी या भागात काही काळ विश्रांती घेत आपल्या पुढील प्रवासाला सुरुवात करतात.

**<><><><><>**

पालघर जिल्हा परिषदेचा आरोग्य विभाग नवरात्रौत्सवाच्या निमित्तानं येत्या २६ सप्टेंबर ते ५ ऑक्टोबर दरम्यान जिल्ह्यात "माता सुरक्षित, तर घर सुरक्षित" हे अभियान राबवणार आहे. १८ वर्षांवरच्या सर्व महिला, माता आणि गरोदर स्त्रिया

यांची आरोग्य तपासणी, रोगाचा प्रतिबंध तसचं उपचारासाठी आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणं हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे.

**<><><><><><>**

येत्या दोन दिवसात कोकण आणि विदर्भात काही ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे. हवामान विभागानं विदर्भात येलो अलर्ट दिला आहे.

**//<><><><><>//**